# संदर्भ ग्रंथ सूची

## संदर्भग्रंथ सूची


१) आळतेकर म.मा. - मराठी निबंध, प्रथमावृत्ती, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३.

२) कित्ता.

३) कुरूंदकर नरहर - धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, १९७१.

४) कुलकर्णी श्री.मा. - कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, १९५६.

५) कुलकर्णी मदन - मराठी प्रादेशिक कादंबरी (तंत्र आणि विकास), श्री मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, पहिली आवृत्ती, १९८४.

६) कुलकर्णी वा.ल. - वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर प्रकाशन, १९७५.

७) गर्गे स.मा.-करवीर रियासत.

८) गाडगीळ गंगाधर - साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती.

९) गोखले क. - शिवपुत्र संभाजी.

१०) गॉस एडमंड - उद्धृत रा.शं. वाळिंबे ''वाङ्मयीन टीका'' जनार्दन सदाशिव लि. पुणे, १९४६.

११) चिपळूणकर वि.कृ. - निबंधमाला.

१२) जाधव रमेश - लोकराजा छत्रपती शाहू, सुरेश एजन्सी प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २००२.

१३) जाधव रा.ग. - नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये, कॉन्टिनेंटल, पुणे, १९७२.

१४) जाधव रा.ग. - वाङ्मयीन आकलन, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९७७.

१५) जोग ल.ग. - मराठी कादंबरी.

१६) टण्णू रंगनाथ वामन - पवित्र जीवन, प्रथमावृत्ती, १९८६.

१७) दाढे अरविंद - महारूद्र बाजीप्रभू, अक्षयविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००७.

१८) देशपांडे कुसुमावती - मराठी कादंबरीचे पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ, दुसरी आवृत्ती, १९७५.

१९) देसाई रणजित - पावनखिंड, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुनर्मुद्रण, २००७.

२०) नेमाडे भालचंद्र - टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, १९९०.

२१) पाटणकर रा.भा. - सौंदर्यमीमांसा.

२२) प्रिटले जे.बी. - केतकरी कादंबरी (दुर्गा भागवत), मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६७.

२३) फडके ना.सी. - प्रतिभा साधन, अंजली प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती, १९६३.

२४) बापट ना.वि. - श्रीमंत बाजीराव बल्लाळ उर्फ बाजीराव पेशवे, तृतीय आवृत्ती, १९८०.

२५) बापट ना.वि. - छत्रपती संभाजी महाराज, पहिली आवृत्ती, १९८४.

२६) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा. - मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास), व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३.

२७) बापट वसंत - तौलनिक साहित्य अभ्यास पद्धती, मौज प्रकाशन, मुंबई.

२८) बापट वसंत - तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, श्री.पु. भागवत, यदुनाथ थत्ते, मौज प्रकाशन गृह, आंतरभारती, मौज प्रकाशन, पुणे १९८१.

२९) भिंगारे ल.म. - हरिभाऊ, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९५६.

३०) मुजुमदार गो.गो. - मराठीची सजावट, भाग २ रा.

३१) मोडक बा.प्र. - कोल्हापूर राज्याचा इतिहास.

३२) राजवाडे वि.का. - लेखसंग्रह, संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९३८.

३३) रॉबर्टसन - उद्धृत रा.शं. वाळिंबे - वाङ्मयीन टीका, पुणे, १९४६.

३४) लेले वामन केशव - ललित लेखन व शैली, पहिली आवृत्ती, साहित्यप्रचार केंद्र, नागपूर, १९८४.

३५) विजयकर मोरोबा कोन्होबा - घाशीराम कोतवाल, प्रस्तावना, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, १९८३, दुसरी आवृत्ती, १९६१.

३६) वेलवलकर कॅप्टन - शर्थीनं राज्य जिंकलं, मॅजेस्टिक प्रकाशन, प्रस्तावना, १९६९.

३७) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत खंड १.

३८) संत (प्रा.) जान्हवी - कादंबरी एक वाङ्मयप्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर २, प्रथमावृत्ती, १९७१.

३९) स्वामी व्ही.एन. - महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, आवृत्ती २००७.

४०) Clayton Hamillon - So you are writting a play.

# नियतकालिके


१) तरूण भारत - १ मे २००६.

२) तोडमल - पटारे वर्षा - स्वामीजींच्या साहित्यातील प्रकाशधारा, मनशक्ती, दिवाळी अंक विशेषांक - २००८, वर्ष २७, अंक ८.

३) प्रसाद - संस्थापक : कै. य.गो. जोशी, संपादक - श्री. मनोहर य. जोशी, वर्ष - ५७, अंक १२ वा, जुलै २००४.

४) मोरे सदानंद - राष्ट्रीय भावनेचं मराठीपण, ग्राहकहित दीपावली विशेषांक, नोव्हेंबर - २००८.

५) सकाळ - सप्तरंग पुरवणी, रविवार ९ सप्टेंबर, २००७.

# मुलाखत

## श्री. अरविंद दाढे यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत

**प्रश्न** सर, आपण लेखनाला कधी सुरूवात केली ?

**उत्तर** मी शिक्षकी पेशात असताना सामाजिक आणि ऐतिहासिक विषयावर कथा लिहिल्या आणि त्यानंतर २००३ साली कादंबरी लेखनास सुरूवात केली.

**प्रश्न** मराठीमध्ये अनेक साहित्यप्रकार आहेत. त्यातील कोणता साहित्यप्रकार तुम्हाला अधिक आवडतो ?

**उत्तर** कादंबरी हा माझा आवडता साहित्यप्रकार आहे. कादंबरी ही एखाद्या महाकाव्यासारखी असते. तिचे स्वरूप हे विस्तृत असते. कोणताही विषय हा कादंबरीच्या माध्यमातून सविस्तर रूपाने मांडता येतो. त्यामुळे माझ्या लेखनाला सुरूवात मी कादंबरीच्या माध्यमातून केली.

**प्रश्न** कादंबरी लेखनामागची प्रेरणा कोणाची होती ?

**उत्तर** औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी शिवचरित्रावर सुंदर चित्रे रेखाटली होती. त्याचा परिणाम माझ्या बालमनावर झाला. भालजी पेंढारकर यांचा छत्रपती शिवाजी महाराजांचा सिनेमा माझ्या पाहण्यात आला. त्यामध्ये प्रचंड व्यक्तिमत्त्वाचे बाजीप्रभू खिंडीत शौर्याने लढत होते. ते पाहून बाजींबद्दलचा आदर वाढला. ते दृश्य अत्यंत चित्तथरारक होते. त्यातूनच ही कादंबरी लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

**प्रश्न** 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी लिहिण्यास किती वेळ लागला ?

**उत्तर** ही कादंबरी लिहिण्यास मला जवळजवळ चार वर्षे लागली.

**प्रश्न** कादंबरी लिहित असताना कोणते परिश्रम घ्यावे लागले ?

**उत्तर** कादंबरी लेखनासाठी अनेक ऐतिहासिक संदर्भग्रंथांचा आधार घेतला. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी महत्त्वाचे संदर्भ मिळतील त्या ठिकाणी जाऊन तेथील संदर्भ ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. ऐतिहासिक लेखनात किल्ल्यांना जास्त महत्त्व असते. त्यामुळे मी प्रतापगडावर ३५ ते ४० वेळा गेलो. त्या सभोवतालच्या परिसराचा अभ्यास केला.

त्या काळात घडलेल्या घटनांची अनुभूती घेण्यासाठी व कादंबरीत योग्य त्या घटनांची योजना करण्यासाठी किल्ल्यांच्या आसपास असणाऱ्या परिसरातील वातावरणात एक वर्ष भ्रमण केले. बाजीप्रभूंचे व्यक्तिमत्त्व उठावदार होण्यासाठी नीरा-वेळवंडी संगम असणाऱ्या हिरडस-मावळ या परिसरात जाऊन त्या ठिकाणचे निरीक्षण केले.

**प्रश्न** 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत पन्हाळगडाचा उल्लेख आला आहे. अभ्यासासाठी तुम्ही या गडावर गेला होता का ?

**उत्तर** बाजीप्रभूंच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा व शेवटचा प्रसंग पन्हाळगडाशी निगडीत असल्याने मी त्या ठिकाणी चार महिने वास्तव्यास होतो. कादंबरी अधिक भारदस्त व उठावदार होण्यासाठी त्या काळामध्ये घडलेल्या प्रत्येक घटनेची अनुभूती घेण्याचा प्रयत्न केला.

**प्रश्न** ऐतिहासिक कादंबरी लिहित असताना काल्पनिकतेचा आधार घेतला जातो. 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी लिहित असताना तुम्ही तो कितपत घेतला ?

**उत्तर** मी ऐतिहासिक लेखन करीत असताना केवळ तत्कालीन घटनांची अनुभूती घेण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यामुळे काल्पनिकता आपोआप येणारच. मात्र मी इतिहासाशी जास्तीत जास्त प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे वास्तव इतिहासाला कोणत्याही प्रकारचा धक्का लागू नये याचीही काळजी घेतली आहे.

**प्रश्न** 'महारूद्र बाजीप्रभू' ह्या कादंबरीचे शीर्षक कसे सुचले ?

**उत्तर** बाजीप्रभूंचे व्यक्तिमत्त्व हे पराक्रमी रूद्रासारखे मला भासले. त्याशिवाय पन्हाळगडावर बालेकिल्ल्यात बिनखांबी महादेवाचे मंदिर आहे. त्या काळी पन्हाळ्यातून सुटून जाण्याचा राजास कोणताच मार्ग दिसत नव्हता. ते त्या मंदिरात बाजींसह गेले असता मनोभावे हात जोडून त्या पिंडीसमोर बसले तेव्हा बाजी त्यांच्या पाठीशी उभे होते. त्यावेळेस मला असे जाणवले की, तो रंग बदलणारा महादेव राजांना खुणावत असावा

आणि तसाच विचार माझ्या मनात आला. त्यामुळेच 'बाजी' या संपूर्ण व्यक्तिरेखेवर आधारलेल्या कादंबरीचे नाव 'महारूद्र बाजीप्रभू' असे ठेवले.

**प्रश्न** इतिहासामध्ये अनेक पराक्रमी व्यक्तिरेखा आहेत. 'बाजीप्रभू' हीच व्यक्तिरेखा तुम्ही का निवडली ?

**उत्तर** बाजीप्रभू ही शिवकालातील अतिशय महत्त्वाची व्यक्तिरेखा असूनही आजपर्यंत या विषयावर रणजित देसाईंच्या 'पावनखिंड' या कादंबरीशिवाय इतर विशेष लेखन झालेले नाही. मला लहानपणापासून इतिहासातील पराक्रमी व्यक्तिरेखांविषयी आकर्षण होते. बाजीप्रभू ही व्यक्तिरेखा अत्यंत पराक्रमी आहे. त्यांनी गजापूरच्या खिंडीमध्ये केलेला पराक्रम अतिशय देदीप्यमान आहे. त्यामुळे ही व्यक्तिरेखा निवडली.

**प्रश्न** लेखनाव्यतिरिक्त तुमचे इतर छंद कोणते ?

**उत्तर** शिक्षकी पेशा असल्यामुळे सतत बोलण्याची सवय होती. त्यातूनच व्याख्याने देण्याची प्रेरणा मिळाली आणि इतिहास हा आवडीचा विषय असल्याने जिजाऊ माँसाहेबांवर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळ-जवळ एक हजारच्या वर व्याख्याने आजपर्यंत दिली आहेत. शिवचरित्रावर आधारित चित्र काढण्याचा छंद मी जोपासला आहे.

**प्रश्न** तुमचे आवडते लेखक कोण आहेत ?

**उत्तर** बाबासाहेब पुरंदरे हे माझे आवडते लेखक व श्रद्धास्थानही आहेत. इतिहास संशोधक सेतु माधवराव पगडी, पु.ल. देशपांडे व रणजित देसाई यांचे लेखन मला विशेष आवडते.


**प्रश्न** आपले भविष्यातील लेखनविषयक संकल्प काय आहेत ?

**उत्तर** माझ्या 'तानाजी मालुसरे' आणि 'सकलसौभाग्यसंपन्न पुतळाबाई' यांच्या जीवनावर आधारीत कादंबऱ्या प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

# श्री. रणजित देसाई यांचे छायाचित्र


छायाचित्र : व. पु. काळे

# श्री. अरविंद दाढे यांचे छायाचित्र,
# स्वाक्षरी आणि संदेश



छत्रपती शिवाजी राजांनी चेतवलेल्या स्वराज्य, लढ्यात - आणि - त्या स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात ज्या अनेक समिधा पेटलेल्या यज्ञकुंडात पडल्या त्यांपैकी - एक महारुद्र बाजीप्रभू आहेत - त्यांचा दिव्य त्याग - व समर्पण पिढ्यान् पिढ्यांना स्फूर्तिदायक आहे या भावनेतून - ही कादंबरी लिहिली